"women as puppets"
"Ruperi Paddyavaril Kalsutri Bahulya"
Nuriksha

# रूपेरी पडद्यावरील कळसूत्री बाहुल्या

मनमोहन देसाई यांनी तयार केलेले तीन नवीन सिनेमा शहराशहरातून नुकतेच झळकले आहेत. 'अमर, अकबर, अँथनी', 'धरमवीर', आणि 'चाचा भतीजा' हे ते नवे सिनेमा.

ह्या तिन्ही सिनेमातून स्त्रियांना कमी महत्त्वाच्या पण मनोरंजनाच्या करता आवश्यक अशा भूमिका दिल्या आहेत. पण इथे एक वेगळेपणा आहे. तो असा की या सिनेमातील सर्व नायिका ह्या शिक्षित आहेत आणि समाजात त्यांना स्वतंत्र स्थान असावे अशा आहेत. 'अमर...'मध्ये नीतू सिंग डॉक्टर आहे आणि परवीन बाबी विलायतेला जाऊन आलेली आहे. 'चाचा भतीजा'-मध्ये हेमामालिनी स्वतंत्र व्यवसाय करणारी - दारूचा गुत्ता चालवणारी-स्त्री आहे. 'धरमवीर' मधील झीनत अमान राजकन्या आहे व नीतू सिंग एक जिप्सी नर्तिका आहे.

परंतु प्रत्येक सिनेमात नायिकेच्या जीवनात नायकाचा प्रवेश झाला की तिच्या आयुष्याला कलाटणी मिळते. उदाहरणार्थ, 'अमर...'मध्ये नीतू सिंग डॉक्टर म्हणून, सुरुवातीचा थोडा भाग सोडल्यास, पडद्यावर कधीच येत नाही. इतकेच नव्हे तर ती बुरख्यामध्ये वडिलांच्या करड्या शिस्तीखालीच वावरताना दिसते. अकबरही तिच्याशी इतिहासजमा झालेल्या नाजूक व दिखाऊ बेगमा किंवा शहाजादीशी वागावे त्याप्रमाणे वागतो. थोडक्यात, नीतू सिंग ही डॉक्टर आहे तरी सिनेमात तिची खरी भूमिका एका सुंदर दिसणाऱ्या स्त्रीची दाखविली आहे. ती डॉक्टर आहे ह्याचा प्रेक्षकांना (आणि तिलाही) केव्हाच विसर पडतो.

परवीनचेही तसेच. सुरुवातीला ती विलायतेतून शिकून आलेली. त्यातही आपल्यापेक्षा प्रगत आणि संपन्न अशा इंग्लंडमध्ये लहानपणापासून शिकलेली अशी दाखविली आहे. म्हणजेच खरं तर ती कितीतरी समर्थ असायला हवी. पण पुढच्याच दृष्यात एक शरीर-संरक्षक आणि अमिताभच्या रूपाने मानसिक गुलामगिरी ह्या कात्रीत सापडल्यासारखी दिसते, कळसूत्री बाहुलीप्रमाणे ती इकडून तिकडे फेकली जाते. आणि ही विटंबना थांबवण्यासाठी तिच्याजवळ कणभरही शारीरिक वा मानसिक शक्ती नसते! आपल्या सर्व जबाबदाऱ्या जवळपासच्या मर्दानी पुरुषावर टाकून देऊन शक्य तेवढे सुरेख व उत्तेजक दिसावे हेच तिचं काम!

'चाचा भतीजा' मध्ये हेमामालिनीची कथा जरा वेगळ्या प्रकारे सुरू होते. तिचं लक्ष ती चालवीत असलेल्या दारूच्या धंद्यावर केंद्रित असते आणि ती एका कष्टकरी स्त्रीचे जीवन जगते आहे असे वाटते. परंतु यातला बेगडीपणा चटकन लक्षात येत नाही. तिच्या भूमिकेतील भडकपणा व नखरेलपणा कष्टकरी स्त्रियांचे दुःख आणि वेदना ह्याच्याशी पूर्णपणे विसंगत आहे. त्यामुळे प्रेक्षकांना कष्टकरी स्त्रीची एक स्वप्नील दुनिया पाहिल्याचे समाधान! दारूचा धंदा हा तिला दारुड्या धर्मेंद्राशी गाठ घालून देतो आणि मग ह्या चतुर हेमामालिनीचे रूपांतर प्रेक्षकांना जास्तीत जास्त शरीरप्रदर्शन करून दारुड्या नवऱ्याला सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीमध्ये होते.

झीनत अमान ही मनमोहन देसाईंच्या स्त्रियांच्या कल्पनेत चपखल बसणारी! ती अगदी विनायास लाडावलेल्या मर्दानी धर्मेंद्रपुढे शरणागती पत्करून इतर नायिकांप्रमाणे 'गरीब बिचारी' स्त्री बनते.

विशेष म्हणजे ह्या सिनेमातील कोणताही नायक शिक्षितही नाही! तरीही ह्या सिनेमातील सुशिक्षित आणि स्वतंत्र स्त्रिया नायकांच्या खांद्यावर आपला भार

टाकतात आणि निश्चित मनाने परावलंबी जीणं स्वीकारतात !

सिनेमातून अशा तऱ्हेच्या स्त्रीचं दर्शन घडविण्यात कोणता सामाजिक अर्थ दडलेला आहे ?

खरं पाहिलं तर शिक्षण, नोकरीची संधी ह्यातून स्त्रीला विकासाचे नवे नवे मार्ग मोकळे व्हायला हवेत. आजवर दाव्याला बांधलेल्या मूक जनावराचं जिणं जगणाऱ्या स्त्रीवर आज विचार करण्याची वेळ आलेली आहे. आत्मविश्वासाने परिस्थिती सुधारण्याची, स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची गरज त्यांना भासते आहे. आपण एक भोगाचं साधन नाही तर स्वतंत्र माणूस आहोत ही जाणीव तिच्यामध्ये वाढीला लागलेली आहे.

स्त्रियांच्यामध्ये घडून येत असलेल्या ह्या बदलामुळे भारतीय पुरुष मात्र मुळापासून हादरला आहे. कारण तो स्वतः तितका बदललेला नाही. एवढंच नाही तर स्त्री आज तिला समाजात मिळणाऱ्या वागणुकीविरुद्ध आवाज उठवत असल्याने पुरुषी हितसंबंधांना धक्का पोहोचला आहे.

स्त्रियांनी स्वतंत्र होणं पुरुषांना का आवडत नाही ? कारण पुरुषांना अजूनही वाटतं की स्त्री ही पुरुषाची– वडिलांची, नवऱ्याची किंवा मुलाची मालमत्ता आहे, आणि समाजाचं स्थैर्य राह्यचं असेल तर तिनं तसंच राह्यला हवं. इतिहासाच्या ओघात जमीनदारी गेली, कारखानदारी आली, इनामदारी गेली आणि नोकरशाही आली. परंतु भारतीय पुरुष मात्र 'कान गेले, भोकं राहिली' ह्या चालीवर स्त्रीच्या बाबतीत आपली वृत्ती बदलू इच्छित नाही ! सबंध समाजाच्या अर्ध्या भागाच्या–स्त्रियांच्या विरोधी असलेली ही वागणूक पुरुषांना मात्र अतिशय सोयीस्कर आणि फायद्याची असते !

पुरुषाचं वर्चस्व आपल्या समाजात अबाधित आहे ! आणि म्हणून लहानपणापासूनच संस्कारातून आणि शिक्षणातून स्त्रीचे दुय्यम स्थान तिला पटवून देण्यात येत असते. आपला समाज निरक्षर आणि म्हणून सिनेमासारख्या गोष्टींचा इथे फार पगडा बसतो. सिनेमा हे सामाजिक शिक्षणाचे, वाचता न येणाऱ्यांनाही समजणारे असे साधन होते. आज ते सर्वांत स्वस्त आणि परिणामकारक साधन आहे. सिनेमातून पुरुषांना आणि विशेषतः स्त्रियांना 'भारतीय संस्कृती'च्या वेगळी आवरणाखाली जुन्या निष्ठांची जोपासना करायला शिकविले जाते. आपण बाईमाणूस. हे 'बाई माणूसपण' बायका जेवढ्या लवकर ओळखतील तेवढं बरं ! आता काळाच्या ओघात त्यांना शिक्षण मिळालं, नोकरी मिळाली तरी पुरुषाच्या इच्छेपुढं तिनं मान वाकवली पाहिजे असंच शिक्षण मुलींना घराघरातून दिलं जात आणि तेच बरोबर असं सिनेमातून दाखवलं जातं. म्हणूनच डॉक्टर असलेली नीतू सिंग, स्वतंत्र व्यवसाय करून पोट भरणारी हेमामालिनी, विलायतेला जाऊन आलेली परवीन बाबी ह्यांच्यांतून असंच दाखवलं जातं की स्त्रियांमध्ये कुवत आहे परंतु शेवटी पुरुषाचे नियंत्रण त्यांच्या जीवनावर असल्यानं ती कुवत वांझोटी आहे.

आणखी एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मनमोहन देसाईंच्या ह्या सिनेमांमधून नायकांच्या आईच्या भूमिकेला बरेच महत्त्व मिळालेले आहे. आणि ही आई म्हणजे खास 'स्त्रियांचे' म्हणून आदर्श समजल्या जाणाऱ्या गुणांची आदर्श मूर्ती ! ती अशिक्षित असते. साहजिकच आर्थिक दृष्ट्या परावलंबी असते. त्यात तिला तक्रारही करायची नसते. आपलं गौण स्थान तिनं आनंदानं स्वीकारलेलं असतं आणि नवरा, संसार आणि मुलं हेच ती आपलं जीवनसर्वस्व मानते. त्यात दुःख असले तरी अशा दुःखाचाही एक आदर्श उभा केला जातो.

हिंदी सिनेमातील स्त्रीचं चित्र हे असं दिसतं. आणि ह्या चित्राचा फार खोल ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटतो. स्वतंत्र, निर्भिड माणूस म्हणून जगणारी स्त्री हिंदी सिनेमातून दिसत नाही. सिनेमा हे माध्यम जनसामान्यांपर्यंत पोहोचणार असल्यानं सिनेमात रंगविलेल्या स्त्रीच्या प्रतिमेचा स्वीकार समाजामध्ये साहजिकपणे होतो. स्त्रीची ही प्रतिमा, समाजात पुरोगामी मूल्ये रूजण्यास अडसर बनते.

स्त्रीचं असं चाकोरीतलं जीणं जिथं आदर्श म्हणून रंगवलं जातं तिथं नुकसान फक्त स्त्रियांचं होतं असं नाही. अर्धं आकाश सावरणाऱ्या स्त्रिया मागासलेल्या राहिल्या तर असा एक पाय मोडलेल्या, खचलेल्या अवस्थेत, ओढत फरफटत चाललेला समाज पुढचं पाऊल टाकायला असमर्थ व निःसत्त्व राहातो. ---निरिक्षा